जिस तरह पैसों से पैसे कमाए जाते हैं, ठीक इसी तरह सफलता से सफलता मिलती है। सही तरीके से, सही दिशा में कोशिश की जाती है तो काम जरूर पूरा होता है।

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार २२ जानेवारी २०२५ | अंक४४ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२


राहुल मारोतीराव वाईकर

# झटपट हजारो अंडी आणि कोंबड्या नष्ट ! गावागावात कोंबड्या मारण्याचे आदेश !

## भरपाई द्या

बर्ड फ्ल्यू वाढू नये म्हणून केंद्र सरकारने १० टीम तैनात केल्या होत्या. त्याशिवाय चिरनेर परिसरात निर्जंतुकीकरण फवारणी करण्यात येत आहे. त्याशिवाय इतर सुविधाही पुरविण्यात आल्या आहेत. तसेच या भागात दोन टीम तैनात ठेवल्या आहेत. चिरनेर आणि आजूबाजूच्या परिसरावर पुढचे तीन महिने लक्ष ठेवलं जाणार आहे. त्यासाठी या भागात तीन महिने पथक तैनात राहणार आहे, असं पशू वैद्यकीय अधिकारी डॉ. सोमनाथ भोजने यांनी सांगितलं. तर पोल्ट्री व्यवसाय कोलमडला आहे. आम्हाला आर्थिक डबघाईचा सामना करावा लागणार आहे. आमच्या नष्ट करण्यात आलेल्या कोंबड्यांची भरपाई करण्यात यावी. ही भरपाई तात्काळ करण्यात यावी, अशी म ागणी पोल्ट्री व्यावसायिक महेंद्र मोकल यांनी केली आहे.





राज्यात पुन्हा एकदा बर्ड फ्ल्यूने डोकं वर काढलं आहे. ठाण्यानंतर आता रायगड जिल्ह्यात बर्ड फ्ल्यूचा कहर वाढला आहे. उरणमधील चिरनेर येथील काही कोंबड्यांना बर्ड फ्ल्यूची लागण झाल्याचं आढळल्याने हजारो कोंबड्या मारण्यात आल्या आहेत. तसेच हजारो अंडीही नष्ट करण्यात आली आहे. तसेच चिरनेर परिसरातील गावांना कोंबड्या आणि अंडी नष्ट करण्याचे आदेश जिल्हाधिका-यांनी दिले आहेत. शहरात बर्ड फ्ल्यूचा धोका निर्माण झाल्याने नागरिकांम ध्ये भीतीचं वातावरण आहे. तर कोंबडी आणि अंडी विक्रेत्यांवर मोठी संक्रात कोसळली आहे. रायगड जिल्ह्यातील उरणच्या चिरनेर गावात कुक्कुटपालन करणा-या व्यावसायिकांच्या कोंबड्याचा गेल्या काही दिवसांपासून अचानक मृत्यू होत आहे. त्यामुळे कुक्कुटपालन करणारे व्यावसायिक भयभीत झाले होते. अचानक कोंबड्या मरत असल्याने या व्यावसायिकांनी पशूपालन अधिका-यांना त्याबाबतची माहिती दिली. या अधिका-यांनी पोल्ट्रीची पाहणी करून भोपाळ आणि पुण्याला या कोंबड्यांचे सँपल तपासणीसाठी पाठवले. त्याचा अहवालही आला आहे. त्यात यातील काही कोंबड्यांचा मृत्यू बर्ड फ्ल्यूने झाल्याचं आढळून आलं. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

## हजारो कोंबड्या नष्ट

स्वतः पशूपालन अधिका-यांनी गावात जाऊन हजारो कोंबड्या नष्ट केल्या. त्यासोबत हजारो अंडीही नष्ट केल्या आहेत. तसेच पुढील कारवाई सुरू केली आहे. कोंबड्यांना बर्ड फ्ल्यूची लागण झाल्यानंतर हजारो कोंबड्या आणि अंडी नष्ट करण्यात आली. त्यानंतर ग्राहकांनी कोंबडी आणि अंडी खरेदी करण्यासाठी पाठ फिरवल्याने चिकन विक्रेते आणि कुक्कुटपालन व्यावसायिकांवर मोठं आर्थिक संकट ओढावलं आहे. तर, नागरिकांनी सतर्क राहावं, अधिक दक्षता घ्यावी, असं आवाहन प्रशासनाने केलं आहे.

त्यामुळे चिरनेर परिसरातील हजारो कोंबड्या आणि अंडी नष्ट करण्यात आली आहेत. तसेच चिरनेर परिसरातील १० किलोमीटर अंतरावरील सर्व गावांना त्यांच्याकडील कोंबड्या आणि त्यापासून मिळालेली अंडी नष्ट करण्याचे आदेशच जिल्हाधिका-यांनी दिले आहेत. रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर गावात बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. हजारो कोंबड्या आणि अंडी नष्ट करण्यात आली आहेत. जिल्हा प्रशासनाने १० किलोम ीटर परिसरातील गावांनाही सतर्कतेचा इशारा दिला आहे. पोल्ट्री व्यवसायिकांना मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे

## किसान विद्यालयात शालेय क्रिडास्पर्धेला प्रारंभ



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : प्रजासत्ताक दिनानिमि त्त लोहा तालुक्यातील किसान विद्यालय उमरा येथे शालेय क्रिडास्पर्धेला दि.२०-जानेवारी पासून प्रारंभ करण्यात आला. क्रिडास्पर्धेचे उदघाटन शाळेचे मुख्यद्यापक बी.जी. पदमवार यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आले.तर क्रीडास्पर्धा चालू असताना किसान प्रसारक मंडळाचे सचिव स्वप्नील उमरेकर यांनी अचानक भेट दिली.चालू असलेल्या क्रीडा स्पर्धेची त्यांनी पाहणी करत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.व शुभेच्छा दिल्या.यावेळी पी.व्ही सिरसाट, जी.टी.सिरसाट, बी.डब्लू कदम, ए.डी.शिंदे ,एम. एम.बच्चेवार,श्री.शिंदे यांच्यासह शाळेतील शिक्षक शिक्षेकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वडवणी अध्यक्षपदी अशोक निपटे तर डिजिटल मीडियाच्या अध्यक्षपदी सतीश मुजमुले

### कोषाध्यक्षपदी युवा पत्रकार अंकुश गवळी यांची निवड


बीड प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संघटक संजय भोकरे .यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे यांच्या आदेशानुसार व वसंत मुंडे यांच्या म ार्गदर्शनाखाली प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांनी वडवणी तालुका कार्यकारणी जाहीर केली.ज्येष्ठ म ार्गदर्शक विनायक जाधव यांच्या प्रम ुख उपस्थितित सदरील कार्यकारणी निश्चित करून जाहीर करण्यात आली.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा वडवणी तालुका अध्यक्षपदी अशोक निपटे ,उपाध्यक्षपदी शांतिनाथ जैन, सचिव पदी अर्जुन मुंडे, कोषाध्यक्षपदी शंकर झाडे, तर वडवणी तालुका डिजिटल मीडियाच्या तालुका अध्यक्षपदी सतीश



मुजमुले, उपाध्यक्षपदी शेख एजाज, सचिव पदी अशोक फपाळ, कोषाध्यक्षपदी अंकुश गवळी, तर पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या वडवणी तालुका अध्यक्षपदी प्राध्यापक श्रीनिवास काकडे, उपाध्यक्षपदी



ज्ञानेश्वर लंगे. सचिव पदी गंगाभीष्म अंडील सर,कोषाध्यक्षपदी शंकर जाधव, इत्यादीच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत.सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख



वैभव स्वामी यांनी शाल पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या तसेच या निवडीबद्धल जिल्हा भरातुन शुभेच्छांचा वर्षाव होत आहे पुढील कार्यासाठी शुभेच्छा देऊन सत्कार केला.

## रांगोळी स्पर्धेत सुंदर रांगोळी काढून इ ६वीतील विस्वजा जाधव हिने दुसरा क्रमाक पटकवला




पिंपरी चिंचवड परिसरात जानेवारी महिन्यात राबवली जाणारी संस्कार जत्रा यांचे सर्वेसर्वा मा .श्री मोहन गायकवाड सर नेहमीच विद्यार्थ्यांना एक व्यासपीठ मिळवून देत असतात त्या कार्यक्रमांतर्गत विविध स्पर्धा इथे घेतल्या जातात आणि या स्पर्धेत निगडी परिसरातील शिवभूमी विद्यालयातील विद्यार्थी भाग घेत असतात यावर्षीही पुष्कळ मुलांनी प्रत्येक स्पर्धेत सहभाग घेऊन शाळेला बक्षीस प्राप्त केले . ८ जानेवारीला झालेल्या चित्ररंगभरण स्पर्धेत तसेच मॅथ मस्ती आणि हस्ताक्षर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या कला गुणांनी भरघोस यश मिळवले .यातील वैयक्तिक नृत्य मध्ये इयत्ता पहिलीतील सई जोशी हिने दुसरा क्रमांक मिळवला .तर श्रीमद्भगवद्गीता बारावा श्लोक म्हणून इयत्ता पाचवीतील आरती यादव हिने प्रथम क्रमांक पटकावला . वक्तृत्व स्पर्धेमध्ये इशिता फडतरे इ २ री हिने तृतीय क्रमांक मिळवला.तसेच वेशभूषा स्पर्धेत इयत्ता पहिलीतील काव्या पाटोळे हिने दुसरा क्रमांक तर श्लोक तिकोडे (१ली )व इ २ री तील देशमूख सारंग या दोघांनी उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले . रांगोळी स्पर्धेत सुंदर रांगोळी काढून इ ६वीतील विस्वजा जाधव हिने दुसरा क्रमांक पटकवला आणि समूहनृत्य स्पर्धेमध्ये गणेशगीत या गाण्यावर नृत्य करून इ १ली २री च्या गटातून या नृत्याला प्रथम क्रमांकाचे बक्षीस मि ळाले .वरील सर्व स्पर्धेत शाळेच्या मा .मुख्याध्यापिका सौ अश्विनी पाटील मॅडम यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्या शाळेतील उपक्रमशील तंत्रशिक्षिका लेखिका कवयित्री कोठेकर मॅडम या दरवर्षी विद्यार्थ्यांना बाह्य स्पर्धेत भाग घेण्यास प्रोत्साहित करत असतात त्यासाठी त्या स्वतः विद्यार्थ्यांचे पाठांतर घेतात त्यांना मार्गदर्शन करतात त्या स्पर्धे ला घेऊन जातात आणि विद्यार्थ्यांना उत्तेजन देतात त्यांच्याही कष्टाचे चीज होण्यासाठी संस्कार जत्रेचे आयोजक गायकवाड सरांनी साऊथचे सिने कलाकार देवसिंह गिल, शिक्षण आयुक्त शेखर सिंग पोलिस आयुक्त यांच्या उपस्थित सन्मानचिन्ह व पुष्प देऊन सन्मानित केले तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ पाटील यांना आदर्श मुख्याध्यापकांचा पुरस्कार यांना देण्यात आला त्यामुळे उपक्रमशील शिक्षिका कवयित्री कोठेकर योगिता व मुख्याध्यापकांचे सर्व क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे व पुढील वर्षी जास्तीत जास्त विद्यार्थी आपले कला गुण सादर करतील अशी खात्री पालकांनाही वाटत आहे नक्कीच यातून उद्याचे कलाकार निर्माण होतील यात शंका नाही

## महाराष्ट्र राज्य लॉटरी बंद करण्याच्या सरकारच्या कटकारस्थानाला महाराष्ट्र राज्य लॉटरी विक्रेता संघटनेचा प्रखर विरोध..!

मुंबई (प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) सरकारने लॉटरी व्यवसाय बंद करून गोरगरीब लॉटरी विक्रेत्यांच्या पोटावर पाय दिला तर मंत्रालयासमोर तीव्र आंदोलन करून सरकारचा निषेध करणार असल्याचा इशारा म हाराष्ट्र राज्य लॉटरी विक्रेता संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विलास सातार्डेकर यांनी दिला आहे. राज्यातील लॉटरी विक्रेत्यांच्या संघटनानी आपल्या विविध मागण्यांसाठी सोमवारी मुंबई मराठी पत्रकार संघात एका जाहीर पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. ५५ वर्षाचा इतिहास असलेली महाराष्ट्र राज्य लॉटरी सरकारी बाबू बंद करण्याच्या तयारीत आहेत. काही दिवसापूर्वी लॉटरी छपाई बंद केली आहे. आता पूर्ण व्यवसाय बंद करण्यासाठी मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर होणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आल्याने आम्ही प्रसिद्धी माध्यमातून सरकारला आंदोलनाचा इशारा देत आहोत, असे सातार्डेकर यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य पेपर व ऑनलाईन लॉटरी विक्रेता युनियनचे अध्यक्ष चंद्रकांत मोरे म्हणाले की, परराज्यात लॉटरी व्यवसाय करोडो रुपयांचा महसूल देत असताना महाराष्ट्रात लॉटरी व्यवसाय बंद पाडण्याचे कारस्थान का रचले जात आहे ? यामागे सरकारचा काही तरी छुपा डाव आहे. यासाठी आम्ही लवकरच उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेणार आहोत. लॉटरी एजन्टचे अध्यक्ष स्नेहल शहा म्हणाले, सरकारने जर महाराष्ट्र राज्य लॉटरीची योग्य प्रकारे जाहिरात केली तर यातून सरकारचा महसूल वाढेल आणि हा व्यवसाय बंद करण्याची सरकारवर वेळ येणार नाही. मात्र सरकार याकडे गांभीर्याने लक्ष देत नाही हीच खरी शोकांतिका आहे. आज या लॉटरी व्यवसायावर अनेक गोरगरीब, अंध, अपंग, विधवा उदरनिर्वाह करत आहेत.

# श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावरील पुण्यतिथीला भाऊसाहेब भवर यांच्याकडून महाप्रसादासाठी ५१ कट्टे साखर

## महाप्रसादाच्या माध्यमातून अन्नदानाचा अग्निकुंड सुरूच!



### धार्मिक क्षेत्रात पहिल्यापासूनच आवड

धार्मिक क्षेत्रामध्ये पहिल्यापासूनच आवड असल्याने सवड मिळते मग कोणताही कार्य असो त्या ठिकाणी आपण असलं पाहिजे आपल्या कडून शक्य ती मदत सहकार्य झालं पाहिजे असं वाटतं सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली राजकारणाबरोबर सम ाजकारणात आम्ही काम करत आहोत त्यामुळे धार्मिक क्षेत्राची ही आवड पहिल्यापासूनच होती तेच काम पुढे आम्ही आजपर्यंत चालू ठेवला आहे आणि भविष्यातही चालू राहील जे शक्य होईल ते नक्कीच करण्याचा प्रयत्न आमचा असतो. अशा भावना भाजपचे ज्येष्ठ नेते भाऊसाहेब अण्णाभाऊ यांनी व्यक्त केल्या...

कुसळंब प्रतिनिधी

महाराष्ट्रातील महत्त्वाचं तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र गहिनीनाथ गड संपूर्ण महाराष्ट्रामध्ये परिचित आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड येथे ह भ प संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमि त्त भाजपा ज्येष्ठ नेते भाऊसाहेब अण्णा भवर ५० कट्टे साखर देऊन महाप्रसादाच्या अग्नि कुंडामध्ये अन्नदानाचं काम सुरूच ठेवल आहे. दरवर्षी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त ५० कट्टे साखर भाऊसाहेब अण्णा भवर यांच्याकडून देण्यात येते याही वर्षी परिसरातील नागरिकांच्या उपस्थितीमध्ये गहिनीनाथ गडाचे महंत विठ्ठल महाराज यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते भाऊसाहेब अण्णा भवर यांनी अन्नदानाचा अग्नि कुंड अनेक वर्षापासून सुरूच ठेवला आहे. मग पाटोदा तालुक्यातील कोणतेही महत्त्वाचं तीर्थक्षेत्र असो त्या ठिकाणी अन्नदानासाठी शक्य ती मदत करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो याही वर्षी त्यांनी गहिनीनाथ गडावरील हभप संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त ५० कट्टे साखर देऊन आपलं कार्य चालूच ठेवल आहे. त्यांच्या कार्याबद्दल परिसरातील नागरिकाकडून करून त्यांचं कौतुक तर होतच आहे परंतु त्यांच्यासारखं काम सर्वच नेत्यांनी केलं तर नक्कीच आदर्श मिळेल अशा अपेक्षा व्यक्त केल्या आहेत.

### भाऊसाहेब भवर यांच्यासारखे कार्य सर्वच नेत्यांनी केलं तर..

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते आणि सुरेश आण्णा धस यांचे विश्वासू भाऊसाहेब अण्णा भवर यांच्याकडून पाटोदा तालुक्यातील तीर्थक्षेत्रावर वेगवेगळ्या माध्यमातून अन्नदान करण्याचा प्रयत्न अनेक वर्षापासून सुरू आहे. श्रीक्षेत्र अश्विलिंग देवस्थान भगवान बाबा देवस्थान सावरगाव घाट गहिनीनाथ गड यासह परिसरातील सर्वच देवस्थानाला त्यांच्याकडून वेगवेगळ्या माध्यमातून अन्नदानासाठी सहकार्य मिळत आहे त्यांचे हे कार्य खूप मोठ्या प्रमाणात वाढत चालले असल्याने त्यांच्या कार्याचे कौतुक देखील होत आहे. त्याचबरोबर त्यांच्यासारखं काम इतर नेत्यांनीही करावं अशी अपेक्षा सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होत आहेत.

# संपादकीय

## महाकुंभात अग्नितांडव!

प्रयागराज येथे १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यानच्या महाकुंभ मेळ्याला शाही प्रारंभ झाला आहे. या महाकुंभ मेळ्याची तयारी उत्तर प्रदेश प्रशासनाने उत्तम प्रकारे केली आहे. महाकुंभाला येणा-या भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी जातीने महाकुंभाच्या तयारीचा आढावा घेतला होता. या पवित्र धार्मिक सोहळ्यामुळे उत्तर प्रदेशच्या तिजोरीत सुमारे २ लाख कोटी रुपये जमा होणार आहेत. या महाकुंभाला ४० ते ४५ कोटी भाविक येण्याची शक्यता आहे. महाकुंभ ही भारताची अध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरा आहे. यामुळे देश-विदेशातील जनतेला आपल्या प्राचीन परंपरा समजण्यास मदत होणार आहे. येणा-या पिढ्यांनाही हा महाकुंभ मार्गदर्शक ठरेल. यंदाचा महाकुंभ भव्यदिव्य आणि डिजिटल असेल. भाविकांच्या सुविधांसाठी पर्यटन नकाशा, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहायाने सुरक्षा यंत्रणा व स्मार्ट फोनच्या सहायाने प्रसाधनगृहांची स्वच्छता पाहण्याची सोय करण्यात आली आहे. कोट्यवधी भाविक उत्तर प्रदेशात दाखल होत असल्याने प्रवास, निवास व भोजन आदींमुळे स्थानिक व्यवसाय व रोजगार वाढणार आहे. २०२४ मध्ये १६ कोटी भाविकांनी काशी विश्वनाथाचे दर्शन घेतले तर अयोध्येत जानेवारी ते सप्टेंबर २०२४ मध्ये १३ कोटी ५५ लाख भाविक आले होते. यंदाच्या महाकुंभात ४ प्रकारच्या तंबूंची व्यवस्था करण्यात आली आहे. डिलक्स, प्रीमियम, डिलक्स ऑन रॉयल बाथ आणि प्रीमियम ऑन वॉयल बाथ अशा चार प्रकारच्या तंबूंची व्यवस्था आहे. डिलक्स रूममध्ये एक दिवसाचे भाडे साडे दहा हजार रुपये आहे. प्रीमियम श्रेणीचे दिवसाचे भाडे १५,५२५ रुपये आहे. शाही स्नानाच्या दिवशी डिलक्स तंबूचे भाडे १६ हजार १०० रुपये तर प्रीमियम श्रेणीतील तंबूचे भाडे दिवसाला २१ हजार ७३५ रुपये ठेवण्यात आले आहे. या महाकुंभात उद्योगपती गौतम अदानी दररोज १ लाख भाविकांना प्रसादाचे वाटप करत आहेत. महाकुंभामध्ये राहण्याची शाही व्यवस्था करण्यात आली आहे. नदीच्या किनारी ४४ तंबू आहेत. त्यात २ जणांची राहण्याची सोय आहे. या तंबूचे एका दिवसाचे भाडे १ लाख रुपये आहे. या तंबूत बटलरपासून रुम हिटर, बाथरूम, गिझर आदी सुविधा आहेत. १४, २९ जानेवारी व ३ फेब्रुवारीला या तंबूंना मोठी मागणी आहे. कारण या दिवशी शाही स्नान असते पैकी १४ जानेवारीचे शाही स्नान पार पडले आहे. प्रयागराज येथे गंगा, यमुना आणि सरस्वती नदीचा पवित्र संगम आहे. ४५ दिवस चालणा-या या कुंभमेळ्यात कडेकोट सुरक्षा व्यवस्था आहे. १३ जानेवारीला महाकुंभमेळा सुरू झाला. पहिल्याच दिवशी दीड कोटीहून अधिक भाविकांनी त्रिवेणी संगमावर स्नान केले. दर तासाला सुमारे २ लाख भाविकांचे स्नान झाले. महाकुंभाच्या मुख्य स्नान आणि मकरसंक्रांतीच्या दिवशी हेलिकॉप्टरमधून संत आणि भक्तांवर २० क्विंटल फुलांचा वर्षाव करण्यात आला. दर १२ वर्षांना होणारा कुंभमेळा २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीला संपेल. अशा या शाही महाकुंभमेळ्याला रविवारी (१९ जानेवारी) भीषण आग लागल्याने गालबोट लागले. या आगीत १८ तंबू जळून खाक झाल्याचे वृत्त आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी घटनास्थळी जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला. कुंभनगरीतील सेक्टर १९ मधील एका तंबूत स्वयंपाक सुरू असताना दुपारी साडेचारच्या सुमारास एका सिलिंडरमध्ये स्फोट झाला. या ठिकाणी गीता प्रेस या प्रकाशन संस्थेचे शिबिर आहे. आगीने आजूबाजूचे तंबू पेटले त्यामुळे तंबूतील सिलिंडरचेही स्फोट झाले. आग लागलेल्या ठिकाणाजवळ रेल्वे पूल आहे. अग्निशमन दल, एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या कर्मचा-यांनी तासाभरात आग आटोक्यात आणली. आगीत गीता प्रेसचे लाखो रुपयांचे साहित्य जळाले. आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यात आले आहे. रविवारपर्यंत सुमारे ८ कोटींहून अधिक भाविकांनी संगमावर स्नान केले, असो. एवढ्या मोठ्या सोहळ्याचे आयोजन करताना काही अप्रिय घटना होतातच. पर्यावरणाच्या असमतोलातून नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास त्यावर नियंत्रण ठेवणे हे प्रगतीचा टेंभा मिरवणा-या मानवाला शक्य होत नाही, हे आजवर अनेक वेळा सिद्ध झाले आहे. गत आठवड्यापासून लॉस एंजेलिसमध्ये भडकलेल्या आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू असताना दक्षिण कॅलिफोर्नियात नवी आग लागली. महाशक्तीशाली अमेरिकासुद्धा या आगीसमोर हतबल झाली.

# रसिक प्रेक्षकांच्या मनात अधिराज्य गाजवणारे कलावंत सिने. सुनील कुकूडकार

सुनील कुकुडकार यांचा जन्म २२ जुलै १९८२ ला सर्वसामान्य कुटुंबात चंद्रपूर जिल्हातील सावली तालुक्यातील मुडझा या छोट्याशा खेडेगावात झाला. त्यांचे आईवडील मोलमजुरी करून कुटूंब चालवत होते. त्यांचे आई वडील काही दिवसांनी मोलमजुरी करिता मुल तालुक्यातील मारोडा इथे आले आणि तिथे स्थायिक झाले.

सुनील कुकुडकर यांना बालपणापासून च नाट्यकलेचा छंद होता. इयत्ता पाचवी नंतर त्यांनी एकांतात कॉमेडी करणे,एखाद्या टवाळक्या करणे अशा प्रवास त्यांचा सुरु राहिला.त्यांच्या गावालगत नाटके असले कि ते नाटक बघण्यासाठी जात होते. आणि ते स्वतः लिहिलेला गीत एखाद्या गायकाची चाल देऊन स्टेज वर जाऊन सादर करत होते.दिवसेंदिवस नाटकामध्ये गीत गायनाचा त्यांचा प्रवास सुरु राहिला. कुठे चांगला कुठे वाईट अनुभव आला. वाईट अनुभवाचा मात करून सुनील कुकुडकर यांनी ठरविले कि आज जरी प्रेक्षक चांगला/ वाईट अनुभव घेत असणार पण पुढे हेच प्रेक्षक मला पैसे देऊन बघितले पाहिजे.नंतर त्यांनी जिद्दीने मेहनत केली व त्यांना नाट्य कलेचा छंद अजून वाढत गेला. तेव्हा ते जेष्ठ नागरिक प्रभाकर भोयर यांच्याकडे प्राव्हेट नोकरी वर होते. सुनील कुकुडकर हे प्राव्हेट नोकरीवर असून सुद्धा प्रभाकरभाऊ भोयर यांनी नाटक करायला जाऊ देत होते त्यांच्या कलेला दाद देऊन सुनील कुकुडकर यांचा उत्साह वाढवत होते.त्यांच्या कलावंत होण्याच्या मागे प्रभाकरभाऊ भोयर आणि त्यांच्या पत्नी नगराध्यक्ष रत्नमालाताई भोयर यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांची सुरुवात दंडार पासून झाली.

त्यानंतर शरद गणवीर निर्मित ङ्करासरंग रंगभूमीङ्क या प्रेस ला त्यांना काम करण्याची संधी मिळाली.त्या प्रेस ला त्यांना कॉमेडी रोल मिळाला आणि ते मेहनतीने तो रोल करू लागले आणि त्यांचा अभिनय लोकांना आवडू लागला. असाच त्यांचा प्रवास सुरु राहिला.

सुप्रसिद्ध गायक संतोष कुमार यांच्या मदतीने परमानंद गहाणे निर्मित ङ्ककलादर्पण नाट्य रंगभूमीङ्क या प्रेस ला ते कॉमेडी रोल करून लागले.ङ्ककलादर्पण नाट्य रंगभूमीङ्क नंतर त्यांनी अम्मा भगवान प्रेस ला जुळले तेव्हा त्यांच्या वाट्याला व्हीलन भूमिका आली तेव्हापासून ते व्हीलन करू लागले आणि प्रेक्षकांना आवडू लागली. त्या नंतर त्यांनी रंगतरंग या प्रेस ला जुळले त्या प्रेस ला त्यांनी नशीब नाट्यप्रयोगत ५ रोल केले.त्यांचा अभिनय प्रेक्षकांना आवडू लागला आणि त्यांची एक वेगळी ओळख निर्माण होऊ लागली.

त्यानंतर त्यांनी भारत प्रेस, रंगतरंग रंगभूमी , अम्मा भगवान रंगभूमी एकता रंगभूमी, कलदर्पण रंगभूमी असा प्रवास सुरु झाला.

त्यांनी ताजूल उके निर्मित एकता नाट्य रंगभूमी मध्ये जुळले.त्या प्रेस ला त्यांनी हिरो, कॉमेडी, कॅरेक्टर असे अनेक भूमिका साकारल्या. चित्कार,नशीब, माणुसकी, आघात, हंबरते गाय वासराची अश्या अनेक नाटकात त्यांनी अभिनय केलेलं आहे. त्यानंतर त्यांनी राम बरडे निर्मित तन्मय नाट्य रंगभूमी मध्ये जुळले. त्या प्रेस नागीण नाट्य प्रयोगात त्यांनी नागेश्वर चंडाल व्हीलन भूमिका साकारली तो नाटक प्रचंड गाजला.

वेड लावी रसिक प्रेक्षकांना
बघून अभिनय त्यांचा सुंदर
रसिक प्रेक्षकांचा आवडता
कलावंत सुनील कुकूडकर

गेल्या १६ वर्षांपासून सुनील कुकुडकर यांना वाट्याला जो पात्र आला त्यांनी मेहनतीने तो पात्र निभावून रसिक प्रेक्षकांच्या मनात अधिराज्य गाजवले आहेत. मुल शहरात रिलीज झालेला बेबस हिंदी मूवी मध्ये त्यांनी खलनायक ची भूमिका साकारली आहे.मागील २ वर्षांपासून सुनील कुकुडकर हे परमानंद गहाणे निर्मित कलादर्पण नाट्य रंगभूमी या प्रेस ला काम करत आहेत. त्या प्रेस ला त्यांनी कलंकित ठरवलंय तुझा मातृत्व, अन्याय, प्रतिशोध कुंकवाचा, टिळा कुंकवाचा, जिवलगा मी घायाळ, बायको बिलंदर अश्या अनेक नाटकात काम करून ते रसिक प्रेक्षकांचे चाहते ठरले.सुनील कुकुडकर यांनी अनेक नाटकात काम करून आपली एक वेगळी ओळख निर्माण केली. अश्या अष्टपैलू, आपुलकी जपणारे सुनील कुकूडकार यांचे जेवढे कौतुक केले तेवढे कमीच..

कविवर्य अजय राऊत, कवठी
मो. नं. ८९९९६६१६८५

# माई

माईङ्कशब्द उच्चारताच डोळ्यासमोर एक प्रेमळ, करारी,सुसंस्कृत स्त्री डोळ्यासमोर साकार होते.माई म्हणजे माय,माता.माई जन्मदात्री नसली तरी माईची माया ज्याला मिळते तो खरोखरच भाग्यवान असतो. प्रत्येकालाच अशी माई भेटली असेल असे नाही.पण ज्याला ती भेटली असेल, तो मात्र नक्कीच भाग्यवान आहे.या बाबतीत मी खूप भाग्यवान आहे कारण मला एक नाही दोन, दोन माई माझ्या आयुष्यात लाभल्या. ज्यांनी माझं जीवन समृद्ध केलं.माई या शब्दाला सार्थ करणाया,अंतःकरणात, प्रेम, माया,ममता असणा-या पण प्रसंगी फणसाप्रमाणे काटेरी व कडक शिस्तीच्या,पसंगी कानही पिळणा-या .

माझ्या आयुष्यातील पहिली माई.....माझी मोठी बहिण. कमल तिचं नाव.नावाला सार्थ करणारं रूप. दिसायला सुंदर. पहाताच क्षणी छाप पाडणार व्यक्तिमत्त्व. थोडीशी ठेंगणी,गोरीपान, नाक किंचित नकट पण चेर्हयाला शोभणार, भव्य कपाळ आणि करारी मुद्रा. हुशारीचे तेज चेर्हयावर विलसत असे.ओगलेवाडी आणि परिसरात ती कमलताई या नावानं ओळखली जायची.मी मात्र तिला माई म्हणायचे.माई माझ्या पेक्षा पंधरा वर्षांनी मोठी होती.

माई एसब.एसब.सी.परीक्षा उत्तम मार्कांने पास झाली.तिला ओगलेवाडीतील बाल विकास मंदिरात शिक्षिकेची नोकरी मिळाली.(पूर्वी अशा नोक-या मिळत असत.)
तिची हुशारी,कर्तबगारी,हजरजबाबीपणा,नम्रता,विनय इ.गुणांमुळे ती शाळेत सर्वांची आवडती झाली होती.

त्यावेळेस मी दुसरीच्या वर्गात शिकत होते.माई माझ्या वर्गाची वर्ग शिक्षिका होती.मला खूप आनंद झाला होता.आपली लाडकी माईच आपली वर्गशिक्षिका आहे.ती माझे खूप लाड करायची.माझ्या बालबुद्धीला वाटलं असेल कदाचित, आपली माईच आपली शिक्षिका आहे.आता अभ्यास नाही केला तरी चालेल. आपली काय आता मज्जाच मजा.मी खूप खूप आनंदात होते.माझ्या या आनंदाच्या फुग्याला कडक शिस्तीची सूई केव्हा टोचली कळलेच नाही.हळूहळू फुग्यातील हवा निघून गेली.

माझी माई वर्गात जेव्हा शिक्षिका म्हणून यायची तेव्हा ईतर विद्यार्थांप्रमाणेच मी तिची विद्यार्थिनी असायची.तिला मनापासून वाटायचं ती जे काही शिकवते ते प्रत्येक विद्यार्थाला कळले पाहिजे.आलं पाहिजे.यासाठी तिचा खूप प्रयत्न असायचा.किंबहुना अट्टाहास असायचा.

शाळेत दररोज गृहपाठ दिला जायचा. दुर्सयाच दिवशी तो केला आहे की नाही ते तपासले जायचे.त्यातून मलाही सुटका नसायची.मी काही कामचुकारपणा केला असेल, अभ्यासाकडे दुर्लक्ष केले असेल, वर्गात लक्ष नसेल तर ते माईच्या लगेच लक्षात येत असे.मग माझी काही खैर नसायची. वर्गातील ईतर विद्यार्थ्यांपेक्षा मला जरा जास्तच मार मिळायचा.काही वेळेस तो मार ईतका असायचा की वर्गातील मुले मुली चुपचाप होत असत.वर्गात एकदम शांतता असे.मी मात्र हुंदके देऊन देऊन रडत असे. गालावर पाच बोटं आपली लाली दाखवून देत. पाठ छान शेकून निघालेली असे.दुसरीतल्या त्या जीवाला तो मार फारच होई.पण त्यातून सुटका नसे.त्यावेळी मला माईचा खूप खूप राग यायचा. वाटायचं ही माझी बहिण असून सर्वात जास्त मलाच मारते. सर्वात जास्त मीच मार खाते.बरं घरात सांगण्याची सोय नव्हती. कारण अभ्यासातला चुकार पणा घरीही नाही चालायचा.उलट दोन चार सटके आणखीन मिळायचे.

पण आता कळतंय,या सर्वांचा सकारात्मक परिणाम माझ्या पुढील आयुष्यावर झाला.माईच्या भितीने मी अभ्यास वेळेवर करू लागले.ही सवय आयुष्यावर छान परिणाम देऊन गेली.आज खरोखरच तिच्या रागाचं,माराचं पण
त्यामागे दडलेल्या प्रेमाच महत्त्व क्षणोक्षणी जाणवतंय.

दुसरीच्या वर्गात सर्वात जास्त माईच्या हातचा मार खाताना तिचा अतिशय राग येत होता.पण त्यामुळेच लागलेली अभ्यासाची शिस्त, वळण आजही खूप उपयोगी पडतंय.

आता पावलोपावली जाणवतंय माझी माई योग्यच होती.बरोबर होती.तिने माझ्या जीवनाचा पाया भक्कम करून घेतला.त्यामुळेच माझं शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, सांपत्तिक जीवन समृद्ध झालं आहे.

तिने त्यावेळेस बहिण म्हणून माझं अभ्यासाच्या बाबतीत लाड केले असते,प्रत्येक वेळेस मला अभ्यासातून सूट दिली असती तर.......?

नाही.माझी माई माझी सख्खी मोठी बहिण तर होतीच पण ख-या अर्थाने माझ्या जीवनाला अभ्यासाचं वळण लावणारी,सुसंस्कार करणारी माझी आदर्श शिक्षिकाच होती.
माई तुला मनापासून नमन.
क्रमशः

## बदलापूर नगरीत रत्नागिरी- सिंधुदुर्ग वासियांचे भव्य स्नेहसंमेलन संपन्न..!

बदलापूर (प्रतिनिधी–गुरुनाथ तिरपणकर)रविवार दिनांक १९ जानेवारी रोजी बदलापूर पूर्व येथील श्रीजी सभागृहात, बदलापूर शहरात राहणा–या रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रहिवासीयांचे वार्षिक स्नेहसंमेलन मंडळाच्या अध्यक्षा संगीता चेंदवणकर यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात गणपती बाप्पांचा आशीर्वाद घेऊन आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करून , आणि नंतर कोकणातील पद्धतीप्रमाणे म्हणजेच म्हणजेच देवाला गा–हाणे घालून सुरुवात करण्यात आली. कार्याध्यक्ष महेश सावंत यांनी उपस्थित नागरिकांचे मनःपूर्वक स्वागत करताना कोकणच्या आमच्या साध्याभोळ्या माणसांनी आपल्या कर्मभूमीचे आणि जन्मभूमीचे ऋण फेडण्यासाठी एकजूट होऊन काम करायला पाहिजे अशी भावनिक साद दिली. मंडळाच्या सहसचिव सौ. आशा पालव यांनी प्रास्ताविक करताना मंडळाच्या २३ वर्षांच्या अनेक लोकोपयोगी उपक्रमांचे दाखले देत, येणा–या काळात मंडळाची कशाप्रकारे वाटचाल करायचा मानस आहे याची माहिती उपस्थितांना दिली. याप्रसंगी बोलताना मंडळाचे माजी अध्यक्ष श्री. विजय सावंत यांनी कोणतेही सामाजिक कार्य यशस्वी करायचे असल्यास सर्वांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. माजी सचिव श्री. रमेश मरगज यांनी मंडळाचे सर्व सदस्य कसे एकमेकांना सहाय्य करतात याचे अनेक दाखले देत, आपले मंडळ नेहमीच सर्वांना मदत करण्यासाठी तत्पर असते असे मत व्यक्त केले. याप्रसंगी बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष संगीता चेंदवणकर यांनी येणा–या काळात आम्ही मंडळाचा नक्कीच विस्तार करू आणि मंडळाच्या सदस्यांसाठी तसेच इतर लोकांसाठी सुद्धा अनेक लोकोपयोगी उपक्रम राबवू याचे ग्वाही दिली. मंडळाच्या नवीन कार्यकारिणी समितीत अध्यक्ष तसेच बहुतांश सदस्य महिला आहेत याचा अभिमान व्यक्त करतानाच, स्त्रीशक्तीला मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेणे , महिला सशक्तिकरण करणे हाच यामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. हजारो कोकणवासीय या कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्रित झाले. सदर कार्यक्रमात शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे गुणगौरव तसेच विशेष कार्य केलेल्या यशस्वीतांचा गुणगौरव करण्यात आला. मंडळासाठी अनेक वर्ष कार्य करणा–या सुरेश सावंत, सदानंद चव्हाण , मुग्धा नार्वेकर, सुनिता राणे या ज्येष्ठांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने भव्य नृत्य स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. सर्व लोकांना अगदी मंत्रमुग्ध करणा–या मुलांच्या नृत्यकलेने कार्यक्रमाला जबरदस्त रंगत आली. विजेत्यांना आकर्षक चषक आणि रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले . त्याचवेळी स्त्रियांचे आकर्षण असणा–या पैठणी स्पर्धेतही अनेक स्त्रियांनी उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने नवोदित महिला व्यवसायिकांना त्यांची उत्पादने विकण्यासाठी स्टॉल्स उपलब्ध करून दिले होते. उपस्थित नागरिकांनी या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रमास बदलापूर शहरातील श्री. प्रकाश पाटील, सौ. प्रियांका दामले, सौ. राजश्री घोरपडे, श्री.प्रवीण राऊत, सौ.शितल राऊत, श्री.सूरदास पाटील, श्री.बाळासाहेब कांबरी, गणेश राणे इत्यादी मान्यवर व्यक्तींनी आवर्जून भेट दिली. याप्रसंगी बोलताना मा. प्रवीण राऊत यांनी कोकणी माणसांचे आणि राऊत कुटुंबीयांचे ऋणानुबंध किती दृढ आहे याचे भावनिक वर्णन सर्वांसमोर मांडले. मा.शितल राऊत यांनी कोकणवासीय नेहमीच सगळ्यांशी कसे जुळवून घेतात आणि नेहमीच इतरांना मदत करण्यासाठी तत्पर असतात याची अनेक उदाहरणे दिली आणि आमचा आणि कोकणवासीयांचा हा ऋणानुबंध आम्ही सदैव टिकू याची ग्वाही दिली. याप्रसंगी बोलताना मा. श्री.संभाजी शिंदे यांनी कोकण वासीयांनी एकजूट होऊन आपली स्वतःची एक भव्य वास्तू बदलापूर शहरात उभारायला हवी आणि त्यासाठी आम्ही तुम्हाला नक्कीच मदत करू याची जाहीर ग्वाही सर्वांसमोर दिली. यालाच दुजोरा देत माननीय श्री.बाळासाहेब कांबरी यांनी कोकणवासी यांचे कोकण भवनाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आम्ही सदैव तुमच्या सोबत आहोत असे आश्वासन दिले. श्री सूरदास पाटील यांनीही कोकणातील माणसे आणि आम्ही स्थानिक यांचे जिव्हाळ्याचे संबंध असल्याचे सांगितले. ही सर्व माणसे नेहमीच आमच्या अडीअडचणीसाठी आमच्या पाठीशी उभी राहतात आणि आम्हीही सदैव तुमच्या सोबत असू याची ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमास मंडळाचे माजी अध्यक्ष श्री.अरविंद सावंत, श्री.दत्तात्रय पोसम,श्री.विजय सावंत, श्री.चंद्रकांत पाटील, माजी सचिव श्री. रमेश मर्गज, श्री.मंगेश कदम, श्री.विजय परब, सौ सुवर्णा कदम, श्री.आबा बांदेकर, श्री दत्ताराम गोवळकर इत्यादी अनेक माजी पदाधिकारी तसेच मंडळाच्या कार्यकारणी समितीतील गिरीश राणे, महेश सावंत, अनिता सावंत, आशा पालव, श्रावणी पवार, भावना परब, अंकिता सदडेकर, गुरुनाथ तिरपणकर, श्रद्धा मिस्त्री, शमिका मुणगेकर, अर्चना राणे आणि अनेक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साह आणि आपुलकीने भरलेल्या या रंगतदार कार्यक्रमाची, रुचकर स्नेहभोजनाने आणि पुढच्या वर्षी अधिक भव्य दिव्य असा कार्यक्रम साजरा करण्याचे आश्वासन देऊन सांगता करण्यात आली.

# एसकेजब,म्युझिक मंत्रा आयोजित महाराष्ट्राची स्वरगाथा हा सास्कृतिक कार्यक्रम उत्साहात सपन्न.




## जनजागृती सेवा संस्थेचा प्रिंट मिडीया पार्टनर म्हणून सहभाग

-ठाणे(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)शर्मिला केसरकर म्हणजे इंटरटेनमेंट,स्वर ताल लय आणि संगीत असा स्वरधारेधारेचा अनोखा मिलाप.म्युझिक मंत्राचा कुठल्याही संगितमय कार्यक्रमाचा आस्वाद घेणे एक पर्वणीच असते.ठाणेकरांना त्याचा प्रत्यय आला.म्युझिक मंत्राच्या संचालिका शर्मिला केसरकर आणि सहा संगीतकारांच्या व गायक कलाकारांच्या साथीनेङ्कमहाराष्ट्राची स्वरगाथाङ्कहा सांस्कृतिक कार्यक्रम सहयोग मंदीर हॉल,घंटाळी,ठाणे पश्चिम येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.याप्रसंगी गायिका ऑर्गनाझर शर्मिला केसरकर,गायक व सह दिग्दर्शक गणेश मांजरेकर,गायक अतुल खरे,शरद चौधरी,मंगेश पारकर,जितेश,धनंजय बी,डॉ.राजेंद्र काळे,पेंडसे,इंद्रनील,गायिका डॉ.माणिक काळे,संगिता,सोनाली वाळवे,प्रज्ञा तांबे,निलम,ओंमकार दाहोत्रे यांनी गायीलेल्या विविध गाण्यांनी रसिक प्रेक्षकांची मने जिंकली. जयश्री सोलकर यांचे लावणी नृत्य लाजबाब होते.महाराष्ट्राची स्वरगाथा या संगितमय कार्यक्रमात नृत्य दिग्दर्शक संदेश पाटील,विडीओग्राफर रविंद्र तिळककर,राकेश,ऑडिओक्राफ्ट भगवान भोईर,संगीत दिग्दर्शक तुषार बने यांचे विशेष सहकार्य लाभले.मध्यातंरा मध्ये उपस्थित प्रमुख पाहुणे या कार्यक्रमाचे मिडिया पार्टनर म्हणुन जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांच्या हस्ते ऑर्गनाझर शर्मिला केसरकर यांचा शाल,पुष्पगुच्छ,सन्मानपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करुन सत्कार करण्यात आला.याप्रसंगी ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघाचे उपाध्यक्ष,विभाग प्रमुख विजय चव्हाण,ध्यान प्रशिक्षक,लेखिका,व्याख्यात्या आरती भार्ज,कवी वृत्तपत्र लेखक मनमोहन रोगे,ॲन्टीपायरसी सेल मुंबई चे तपाशी अधिकारी रामजित गुप्ता,देवांग कोष्टी समाजाचे ठाण्यातील जेष्ठ कार्यक्रर्ते चंद्रकांत कडुलकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.या सर्वांचा शर्मिला केसरकर व त्यांच्या सहकार्यांनी भेटवस्तू देऊन यथोचित सत्कार केला.उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.शर्मिला केसरकर या म्युझिक मंत्रा या संस्थेच्या माध्यमातून विविध ठीकाणी ऑर्केस्ट्रा आयोजित करत असतातच,आणि सामाजिक बांधिलकी म्हणूनही सामाजिक क्षेत्रातही त्यांचे कार्य अतुलनीय आहे.शर्मिला केसरकर या भाजपा डोंबिवली शहर चित्रपट कामगार आघाडीच्या अध्यक्षा म्हणून कार्यरत आहेत.जनजागृती सेवा संस्थेने या कार्यक्रमात प्रिंट मिडीया पार्टनर म्हणून सहभाग घेतला होता.महाराष्ट्रची स्वरगाथा या संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्वाती पांचाळ हसमुखाने खुमासदारपणे केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः शहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २२ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



# तत्सवितुर्वरेण्यमब भर्गो देवस्यधीमही धी यो योन: प्रचोदयातब

सकाळी सात वाजता बिस्किटाचे वाटप सुरू झाले. चहा आला. ङ्गअंकल चाय चाय चायः ङ्ग किती समर्पक संबोधन! ही भारतीय रेल्वेची सेवा आहे राजा हे लक्षात असू दे. कारण काही भाविकांना मोठ्याने बोलल्याशिवाय ऐकू येत नाही याची सेवा देणा-या कर्मचा-याला शंभर टक्के खात्री होती. तसेच काही जणांना एकदा सांगून कळत नाही हेही त्याला माहीत होते. काही जणांचे आपल्या सूचनांकडे लक्ष नसते काहीजण मुद्दाम दुर्लक्ष करतात असाही त्यांचा अनुभव असावा. असो. शेवटी काय तर चहा महत्त्वाचा.

पार्श्वभूमीत ओमब भूर्भुवःस्वाहा तत्सवितुर्वरेण्यमब भर्गो देवस्यधीमही धी यो योनः प्रचोदयातब गायत्री मंत्राचे पठण गोड आणि गंभीर आवाजात सुरू होते. या वैदिक मंत्राचे आध्यात्मिक सामर्थ्य ङ्गनासाङ्ग या संस्थेने देखील केला आहे ते शब्दसामार्थ्य अंतरात झिरपत होते. लोक मोठ्या आस्थेने ऐकत होते. घर संसार थोड्या काळाकरिता का होईना विसरले होते. मंत्रोच्चाराने सारा डबा भारीत होऊन चैतन्यमय झाला होता. लोक म्हणणार नाही मी यांना भाविक असेच संबोधन करीन. सडपातळ बांध्याचे जाडजुड मध्यम बांध्याचे आणि थोडक्यात तरुण ज्येष्ठ असे सर्व प्रकारचे लोक आपापला डौल सांभाळून होते. मुख्य म्हणजे आनंदी होते प्रसन्न होते. महाकुंभात आपण सहभागी होत आहोत याबद्दल स्वतःला भाग्यवान समजत होते. पाचशे वर्षांच्या प्रतीक्षेनंतर प्रभू श्रीरामाचे दर्शन भव्य दिव्य मंदिरात होणार असल्याचा विलक्षण आनंद चेह-यावर विलसत होता. काही चेहरे उगाचच चिंताग्रस्त वाटत होते. पण मुळात ते तसे नसावेत तरीही चेहरा तसा का असावा? म्हणजे तसे ते नसावेत परंतु त्यांचा चेहराच तसा असावा. ङ्गक्यूँ रोता है बंदेङ्ग असं आपण एकाद्याला विचारावं आणि त्यावर त्यानं तसाच चेहरा ठेवून तितक्याच प्रामाणिकपणे सांगावं ङ्गमेरी सूरत ही वैसी हैङ्ग असंच काहीतरी घडत होतं. बोलका नसलेला मजकूर बोलणारा. मला वाटतं जणू काय ईश्वराची कृपाच असते अशा लोकांवर.

चहा घेत असतानाच समुद्रमंथन कथा सुरू झाली आणि जळगाव स्टेशन आले. सकाळचे सात वाजून एकोणपन्नास मिनिटे झाली होती. जळगावलाच सर्व कचरा / गारबेज खाली उतरविण्यात आले.

सकाळचे आठ वाजून २५ मिनिटांनी भुसावळ गाठले. नाश्त्याला गरमागरम पोहे वडा व टोमॅटो केचप. बसल्या ठिकाणी जागेवरच मिळाले. हरीची कृपा खातालावरी झाली होती. भवतालात थंडी असल्याने पोहे वेगाने गार झाले.

नाष्ट्यानंतर कोणी चार तर कोणी सोळा गोळ्यांची पाकिटे शोधू लागले...

श्रश्र जय श्रीराम श्रश्र

डॉ. लक्ष्मण शिवणेकर

# शैलेंद्र दिलीप खोब्रागडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त



(अजय गणविर) सोशल एज्युकेशन मूव्हमेंट (डएच), मुंबई द्वारे नाडकर्णी पार्क मुंबई पब्लिक हिंदी शाळा क्रमांक ०२ वडाळा पूर्व मुंबई- ३७ चे प्रशिक्षक श्री शैलेंद्र दिलीप खोब्रागडे यांना माध्यमिक या गटामध्ये आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

मागील तीन वर्षापासून सोशल एज्युकेशन मूव्हमेंट (डएच), मुंबई द्वारे शिक्षकांच्या कार्याला प्रोत्साहन देऊन व त्यांच्या द्वारे केले गेलेले कार्याची दखल घेऊन, विद्यार्थ्यांमध्ये एक नवीन प्रेरणा व समानतेचे विचार प्रेरित करणा-या शिक्षक व शिक्षिकांना आदर्श पुरस्कार देण्याचे उपक्रम सुरू आहे. यामध्ये संस्थे द्वारे १२ प्रश्नांची एक प्रश्नावली तयार केली गेली आणि त्या प्रश्नांचे उत्तरांची वैचारिक पातळी वर या पुरस्काराची निवड करण्यात येणार होती. त्याच प्रमाणे यावर्षी सुद्धा ३ पुरुष शिक्षक व ३ शिक्षिका यांचा सोशल एज्युकेशन मूव्हमेंट (डएच), मुंबई च्या वतीने पुरस्कार देऊन त्यांना सन्मानचिन्हे, पारितोषिक रकम व प्रशस्तीपत्र देऊन यथोचित गौरव करण्यात आला. खरं तर हा उपक्रम एक वेगळा विचारांचा आहे. ज्यामध्ये आपल्या विचारांवर व केले गेलेल्या उपक्रमावर पुरस्काराची निवड करण्यात आलेली आहे. सदर प्रसंगी डएच चे अध्यक्ष प्रा. श्री. गजानन डोंगरे साहेब चेतना महाविद्यालय ( वांद्रे), प्रमुख वक्ते म्हणून डॉ. मृणालिनी आहेर सहायक प्राध्यापिका/कवयित्री यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (सातारा) यांनी वसा व वारसा ज्योती व सवित्रीचा यावर खूप छान विचार मांडले.यासोबत आयु. श्याम शिरसाट साहेब, आयु. सुमित माटे साहेब, आयु. नीलम शिरसाट मॅडम, आयु. जितेंद्र सोनारकर साहेब, आयु. रेमिल हेरेंझ साहेब उपस्थित होते.

प्राध्यापिका सन्मा. मृणालिनी आहेर मॅडम यांनी आपल्या मनोगतात त्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या फक्त नावावरून कशा प्रकारे वाद निर्माण झालं आणि त्यांना त्यावेळी कशाप्रकारे त्रास सहन करावं लागलं आणि त्यांनी मुंबई हायकोर्टाद्वारे ज्या प्रकारे आपली ही लढाई जिंकली ते अनुभव मांडले. त्यांनी आपल्या तत्त्वावर अडिग राहणे व न घाबरता सत्याची लढाई जिंकली जाऊ शकते हे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले. त्याच प्रकारे शिक्षक सुजाण, सुसंस्कृत नागरिक घडविण्याचे कठीण कार्य करतात ज्याने समाजात एक बदल घडविणे शक्य होतो. त्यांनी पुरस्कृत शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. सर्व आयोजक मंडळाने यासाठी खूप मेहनत घेतली होती.

# अगस्त्या इंटरनॅशनल फौंडेशन आणि सॅमसंग आयोजित अन्वेषणा २०२५ उत्साहात संपन्न

जुईनगर (नवी मुंबई:प्रदीप कासुर्डे)ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थी व इंजिनीरिंग कॉलेज विद्यार्थी यांनी एकत्र येऊन समाजातील समस्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सोडवणे याचा प्रत्यय म्हणजे अन्वेषणा प्रोग्राम होय. अगस्त्या इंटरनॅशनल फौंडेशन वतीने दरवर्षी हा उपक्रम आयोजित केला जातो. अन्वेषणा २०२५ चे आयोजन बुंट्स हॉल जुईनगर नवी मुंबई येथे करण्यात आलें होते.या दोन दिवसीय प्रदर्शनाचे उदघाटन दिनांक ९जानेवारी रोजी पार पडले. याप्रसंगी मा.डॉ.उमेश कुमार,डॉ.ललिता धारेश्वर मॅडम,मा.अरुणा यादव मॅडम,मा.विक्रांत सोलंकी सर मा.सुलभा बारगरे मॅडम,उपस्थित होते.हा उपक्रम शालेय विद्यार्थी व इंजिनियरिंग



विदयार्थ्यांसाठी खूप मोठे व्यासपीठ देणारा असून येणा-या काळातील इंनोवेटर्स घडवणारा आहे. अशा प्रतिक्रिया मान्यवरांनी व्यक्त केल्या.यावर्षी महाराष्ट्र व गुजरात येथून २०९ प्रोटोटाईप पहिल्या फेरीसाठी सादर करण्यात आलें होते यातील दुस-या फेरीसाठी ६० मॉडेल निवडण्यात आलें. यातून अंतिम फेरीसाठी १२ कॉलेज वतीने ४० मॉडेल पात्र ठरले. यात विविध विषय घेण्यात आलें होते. शेती,आरोग्य,दैनंदिन जीवन, विविध सॉफ्टवेअर,अँप्स, टाकऊ पासून टिकाऊ,वाहतूक, प्रदूषण,इलेक्ट्रिसिटी,पार्किंग आर्टिफिसिअल इंटिलिजन्स असे अनेक विषय होते. या प्रदर्शनाला नवी मुंबईमधील विविध शाळा, कॉलेज, मधील विद्यार्थी, शिक्षक, पालक यांनी भेट दिली.१० जानेवारी रोजी डॉ. राजकुमार अवसरे,मा.अमित शहा,मा. अलोक द्विवेदी, मा. विक्रांत सोलंकी,मा. पराग सावंत या मान्यवरांच्या हस्ते बक्षीस समारंभ पार पडला.यात प्रथम क्रमांक एसआईएस कॉलेज ऑफ इंजिनीरिंग, द्वितीय क्रमांक विवा इन्स्टिटयूट ऑफ टेकनॉलॉजी कॉलेज विरार, तृतीय क्रमांक लक्ष्मी इन्स्टिटयूट गुजरात, चतुर्थ क्रमांक विवा इन्स्टिटयूट ऑफ टेकनॉलॉजी कॉलेज विरार, पंचम क्रमांक विवा इन्स्टिटयूट ऑफ टेकनॉलॉजी कॉलेज विरार तसेच उत्तेजनार्थ क्रमांक पीव्हीजी कॉलेज ऑफ इंजिनिरिंग नाशिक,जवाहर कॉलेज ऑफ इंजिनीरिंग नाशिक,संघवी कॉलेज ऑफ इंजिनीरिंग नाशिक विवा कॉलेज ऑफ टेकनॉलॉजी यांना मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आलें.या दोन दिवसीय कार्यक्रमासाठी अगस्त्या विभाग प्रमुख मा.कौस्तुभ दीक्षित,मा.सार्थक सपकाळ,मा. शुभांगी लोंढे,अन्वेषणा कॉर्डिनेटर राजू आवटी सर कॅटेलायजर टीम,सर्व इंग्रेटर, तसेच सारथी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# अगस्त्या इंटरनॅशनल फौंडेशन आयोजित वाकोवाक्यम स्पर्धा नवी मुंबईत उस्फुर्त प्रतिसादात संपन्न

नवी मुंबई ( प्रदीप कासुर्डे ): विदयार्थ्यांमध्ये विज्ञान तंत्रज्ञान याची आवड निर्माण व्हावी विज्ञानाचे ज्ञान अद्ययावत व्हावे या उद्देशाने अगस्त्या इंटरनॅशनल फौंडेशन व एवशश्रत्रऌींश यांच्या सहकार्याने महाराष्ट्रात जिल्हा स्तरावर व नंतर राजस्तरावर वाकोवाक्यम ( प्रश्नमंजुषा ) स्पर्धा घेतली जाते. मुंबई जिल्हा स्तरावरील स्पर्धा दिनांक १७ जानेवारी रोजी नवी मुंबई विदयालय वाशी येथे घेण्यात आली. यात मुंबई, नवी मुंबई, पनवेल विभागातील २३ शाळेतील इयत्ता ७वी व ६वी तील विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रम उदघाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून नवी मुंबई विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. मनोज गुरव सर आणि मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका मा.संगीता मॅडम , अगस्त्या इंटरनॅशनल फाऊंडेशन चे रिजनल एक्सपेरियन्स लीडर मा.पराग सावंत सर उपस्थित होते.खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धेला सुरुवात झाली आणि हळूहळू विदयार्थ्यांची उत्सुकता वाढू लागली.ग्रुपमधील समन्वय प्रश्न समजून घेणे, विचार करणे, समय सूचकता,आत्मविश्वास,जल्लोष हे सर्वकाही विदयार्थ्यांमध्ये दिसून येत होते. शाळेतील शिक्षक, इतर विद्यार्थी ही स्पर्धेचा आंनद घेत होते.विदयार्थ्यांसाठी हा अनुभव खूपच छान होता. सर्व गटानी उत्कृष्ट सहभाग नोंदवला.शेवटी स्पर्धेच्या नियमानुसार तीन क्रमांक काढण्यात आले. यात प्रथम व द्वितीय क्रमांक पराग विद्यालय भांडुप मुंबई, तृतीय क्रमांक सुधागड एज्युकेशन सोसायटी शाळा कळंबोली यांनी पटकावला.विजेत्या संघाला मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व विभाग प्रमुख, कॅटेलायजर टीम, इंग्रेटर टीम, सारथी,नवी मुंबई विद्यालय संपूर्ण स्टाफ या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.



# अगस्त्या इंटरनॅशनल फौंडेशन आयोजित

## वाकोवाक्यम स्पर्धा नवी मुंबईत उस्फुर्त प्रतिसादात संपन्न

नवी मुंबई ( प्रदीप कासुर्डे ): विदयार्थ्यांमध्ये विज्ञान तंत्रज्ञान याची आवड निर्माण व्हावी विज्ञानाचे ज्ञान अद्ययावत व्हावे या उद्देशाने अगस्त्या इंटरनॅशनल फौंडेशन व एवशश्रत्रऌींश यांच्या सहकार्याने महाराष्ट्रात जिल्हा स्तरावर व नंतर राजस्तरावर वाकोवाक्यम ( प्रश्नमंजुषा ) स्पर्धा घेतली जाते. मुंबई जिल्हा स्तरावरील स्पर्धा दिनांक १७ जानेवारी रोजी नवी मुंबई विदयालय वाशी येथे घेण्यात आली. यात मुंबई, नवी मुंबई, पनवेल विभागातील २३ शाळेतील इयत्ता ७वी व ६वी तील विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रम उदघाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून नवी मुंबई विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. मनोज गुरव सर आणि मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका मा.संगीता मॅडम , अगस्त्या इंटरनॅशनल फाऊंडेशन चे रिजनल एक्सपेरियन्स लीडर मा.पराग सावंत सर उपस्थित होते.खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धेला सुरुवात झाली आणि हळूहळू विदयार्थ्यांची उत्सुकता वाढू लागली.ग्रुपमधील समन्वय प्रश्न समजून घेणे, विचार करणे, समय सूचकता,आत्मविश्वास,

जल्लोष हे सर्वकाही विदयार्थ्यांमध्ये दिसून येत होते. शाळेतील शिक्षक, इतर विद्यार्थी ही स्पर्धेचा आंनद घेत होते.विदयार्थ्यांसाठी हा अनुभव खूपच छान होता. सर्व गटानी उत्कृष्ट सहभाग नोंदवला.शेवटी स्पर्धेच्या नियमानुसार तीन क्रमांक काढण्यात आले. यात प्रथम व द्वितीय क्रमांक पराग विद्यालय भांडुप मुंबई, तृतीय क्रमांक सुधागड एज्युकेशन सोसायटी शाळा कळंबोली यांनी पटकावला. विजेत्या संघाला मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व विभाग प्रमुख, कॅटेलायजर टीम, इंग्रेटर टीम, सारथी,नवी मुंबई विद्यालय संपूर्ण स्टाफ या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.




नुकत्याच उज्जैन येथे मा.शारदा ज्योतिष्य धाम अनुसंधान संस्थान इंदोर मध्य प्रदेश आयोजित ज्योतिष्य महासंमेलनात छत्रपती संभाजी नगरचे रहिवासी असलेले श्री लक्ष्मण जोशी गुरुजी यांना हिंद गौरव आवर्ड या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला भारतासह इतर देशातील विदेशातील जागतिक स्तरावरील ज्योतिषी उपस्थित होते. यापूर्वीही लक्ष्मण जोशी गुरुजी यांना ज्योतिषी कार्याबद्दल अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहे. जोशी गुरुजी यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# उज्वल व्यसनमुक्ती केंद्र साकोली अंतर्गत व्यसनमुक्ती जनजागृती शिबिराचे आयोजन

शिलवंत बहुद्देशिय विकास संस्था, भंडारा द्वारा संचालित उज्वल व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्र साकोली अंतर्गत कुंभली येथे मकरसंक्रांती दुर्गाबाई डोह यात्रे निम्मित दिनांक १४ जानेवारी २०२५ ते १७ जानेवारी २०२५ ला चार दिवसिय व्यसनमुक्ती जनजागृती शिबिराचे आयोजन करून व्यसनमुक्त समाज निर्मिती कशी होईल या बाबत जनजागृती करण्यात आली.

सदर कार्यक्रमासाठी मुखतः व्यसनमुक्ती केन्द्राचे संपूर्ण कर्मचा-यांचे विशेष सहकार्य लाभले, लांबून लांबून येणा-या



सर्व भक्त भाविकांना, व्यसनमुक्ती बद्दल माहिती देऊन त्यांना माहिती पत्रक देण्यात आले.

या जनजागृत्ती शिबिरात जेष्ठ पत्रकार मा. डी. जी. रंगारी सर यांनी उपस्थिती दर्शविली, तब्बल चार दिवस आवर्जून उपस्थिती असलेले संस्थेचे अध्यक्ष मा. गंगाधर धुवाधपारे, संस्थेचे उपाध्यक्ष मा. शिलवंत घोडेस्वार, प्रकल्प संचालिका सौ. उषा घोडेस्वार, जयश्री चिमणकर (नर्स), हेमेंद्र धकाते (गार्ड), राजेंद्र चुटे (सोशल वर्कर), तृप्ती बोरकर (केअर टेकर) इत्यादी उपस्थित होते,तसेच प्रत्येक व्यक्तीपर्यंत माहितीपत्रक पोहचविण्याचे कार्य मोठ्या हिरिहिरीने केले.

सौ.उषा घोडेस्वार यांनी व्यसनमुक्ती बाबत प्रबोधन करून व्यसनामुळे कुटुंब व समाजात प्रतिष्ठा कशी नाश पावत आहे हे सांगितले. काही रुग्ण मित्रांनी आपले मनोगत व्यक्त करून आपण व्यसन करण्याचा पश्चाताप व्यक्त केला. स्वच्छ्ता, आरोग्य व व्यसनमुक्त जीवन असा संदेश उपस्थितांना देण्यात आला.

सर्वांच्या सहकार्याने हा जनजागृत्ती कार्यक्रम अतिशय उत्कृष्ठ रित्या पार पाडण्यात आला.

# चाळकवाडी येथे मराठी बालकुमार साहित्य संमेलन परिसंवाद, कथाकथन, कथावाचनासह शालेय विद्यार्थ्यांचे रंगणार कविसंमेलन

पुणे : सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असलेल्या आणि बालसाहित्यातील मातृ संस्था असलेल्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणेतर्फे दि. २३ व दि. २४ जानेवारी रोजी मराठी बालकुमार साहित्य संमेलनाचे शिवांजली शैक्षणिक संकुल, चाळकवाडी-पिंपळवंडी, नारायणगाव (ता. जुन्नर) येथे आयोजन करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध बालसाहित्यिक ग. ह. पाटील यांच्या जन्मगावी हे संमेलन होत आहे.

मुलांना बालसाहित्याची ओळख व्हावी, त्यांची वाचनाची भूक वाढावी, त्यांच्या चौकस वृत्तीला विहारायला आणखी नवे आकाश लाभावे, नामवंत बालसाहित्यिकांना पाहता यावे, त्यांच्याशी संवाद साधता यावा या उद्देशाने संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू, विश्वस्त, कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी, संवाद, पुणेचे अध्यक्ष सुनील महाजन यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुबंई पुरस्कृत संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ बालसाहित्यिक सूर्यकांत सराफ यांची निवड करण्यात आली आहे. संमेलन नगरीस ग. ह. पाटील बालसाहित्य नगरी असे नाव देण्यात आले असून कै. सौ. मातोश्री अलकामाई भिमाजी सोनवणे सभामंडपात संमेलन होणार आहे. संमेलनाचे उद्घाटन गुरुवार, दि. २३ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ३ वाजता आमदार शरद सोनवणे यांच्या हस्ते होणार आहे. आमदार अतुल बेनके यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. गटशिक्षणाधिकारी अनिता शिंदे, वसंतराव काकडे पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब काकडे, संस्थाध्यक्ष राजेंद्र पायमोडे, संस्था सचिव गजानन चाळक, शाला समिती सदस्य तुळशीराम नरवडे, सुभाष विद्या मंडळाचे अध्यक्ष रमण काकडे, यशवंत पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष महादेव वाघ, चाळकवाडीच्या सरपंच मेघा काकडे, संस्था कोषाध्यक्ष कोंडीभाऊ वामन, प्रा. शा. समिती अध्यक्ष प्रदीप वायकर, संमेलनाचे निमंत्रक जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शरद लेंडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

शुक्रवार, दि. २४ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले असून खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रंथदिंडीला सुरुवात होणार आहे. या प्रसंगी नारायणगाव ग्रामविकास संस्थचे कार्याध्यक्ष अनिल मेहेर, विघ्नहर साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य आशा बुचके उपस्थित असणार आहेत.

संमेलनाच्या ध्वजारोहणानंतर पहिल्या सत्रात सकाळी १०:३० वाजता ङ्गबालसाहित्याची सद्यःस्थितीम या विषयावर परिसंवाद होणार असून यात श्रीकांत पाटील (कोल्हापूर), अनिल कुलकर्णी (पुणे), जालिंदर डोंगरे (जुन्नर) यांचा सहभाग असणार आहे. अध्यक्षस्थानी डॉ. कैलास दौंड (पाथर्डी) असतील. दुस-या सत्रात सकाळी ११:३० वाजता ङ्गमनोरंजनातून बालसाहित्यम अंतर्गत सूर्यकांत सराफ (छत्रपती संभाजीनगर) आणि एकनाथ आव्हाड (मुंबई) मुलांशी संवाद साधणार आहेत. तिस-या सत्रात दुपारी १:३० वाजता ज्येष्ठ बालसाहित्यिक भास्कर बडे (बिड) यांच्या अध्यक्षतेखाली ङ्गशालेय विद्यार्थी कविसंमेलनम होणार असून यात बालसाहित्यिक अलका सपकाळ (धाराशिव) यांच्यासह विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे.

चौथ्या सत्रात दुपारी २:३० वाजता ङ्गकथा पंचकम अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांचे कथावाचन होणार असून बालसाहित्यिक डॉ. विनोद सिनकर (छत्रपती संभाजीनगर) अध्यक्षस्थानी असणार आहेत. दुपारी ३:३० वाजता आयोजित पाचव्या सत्रात संजय ऐलवाड (पुणे), बालकृष्ण बाचल (पुणे) आणि उत्तम सदाकाळ (जुन्नर) कथाकथनम सादर करणार असून रमेश तांबे (मुंबई) अध्यक्षस्थानी असणार आहेत. सायंकाळी ४:३० वाजता प्रसिद्ध बालसाहित्य समीक्षक डॉ. विद्या सुर्वे-बोरसे (नाशिक) यांच्या अध्यक्षतेखाली साहित्य संमेलनाचा



समारोप होणार आहे. महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य विनोद कुलकर्णी, श्रीपाद अपराजित, समर्थ शैक्षणिक संकुलाचे प्रमुख वल्लभ शेळके, विशाल जुन्नर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष अंकुश सोनवणे, जनमंगल परिवाराचे संस्थापक अनंत चौगुले, कुरण येथील जयहिंद शैक्षणिक संकुलाचे प्रमुख विजय गुंजाळ, गजानन महाराज शिक्षण संस्थेचे सचिव वैभव तांबे, जुन्नर येथील शिवाजी मराठा शिक्षण संस्थेचे सुनील ढोबळे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

संमेलनात सहभागी होणा-या मुलांना साने गुरुजी यांच्या १२५व्या जयंतीनिमित्त साने गुरुजी यांच्या कथांचा संग्रह भेट देण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या कानाकोप-यातून येणा-या साहित्यिक व साहित्यप्रेमींना जुन्नर येथील अस्सल पदार्थांचा आस्वाद घेता येणार आहे. मासवडी, बाजरीची भाकरी, आमटी असा खास बेत असणार आहे.

# श्री महेश लक्ष्मण सोनावले नवक्षितिज महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित



मुंबई : सालाबाद प्रमाणे यंदा ही महाराष्ट्रातील अत्यंत मानाचा राज्यस्तरीय नवक्षितिज महाराष्ट्र गौरव पुरस्कार महाराष्ट्रातील सामाजिक,उद्योग,साहित्य,शैक्षणिक,पत्रकारिता,कला व आरोग्य क्षेत्रात अतुलनीय कार्य करणा-या १६ व्यक्तींना जाहीर झाला होता व या पुरस्काराचा भव्यदिव्य सोहळा रविवार दिनांक १९ जानेवारी रोजी भानुबेन नानावटी कलाघर गोरेगाव पूर्व,मुंबई येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.पुरस्कार विजेत्या सत्कारमूर्तींना शाल,मानपत्र सन्मानचिन्ह व तुळशीचे रोपटे देऊन सन्मानित करण्यात आले.नवक्षितिज चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित या पुरस्कार सोहळ्यासाठी अध्यक्ष म्हणुन राज्याचे माजी पोलीस महानिरीक्षक श्री मोहन राठोड तसेच प्रमुख अतिथी म्हणुन खासदार श्रीमती वर्षाताई गायकवाड,आमदार श्री अनंत (बाळा ) नर,शिवसेना नेते मा.श्री अमोल किर्तीकर धडक कामगार यूनियनचे सरचिटणीस श्री अभिजित राणे, प्रसिद्ध कॉमेडियन श्री एहसान कुरेशी,जेष्ठ वकील श्री जगदीश जायले.प्रसिद्ध साहित्यकार इमरान ताहिर,प्रसिद्ध दिग्दर्शक सुनील कुमार,काँग्रेस नेते क्लाइव्ह डायस,उद्योगपती मा.श्री ईश्वर रणशूर,माजी पोलीस आयुक्त श्री संजय पाटील,समाज सेवक श्री आशिष पाटील,जेष्ठ पत्रकार मनोहर कुंभकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# अजून बरेच व्हिडीओ समोर येतील सीआयडीसोबत १ तास ३८ मिनिटे चर्चा

## धनंजय देशमुख यांचं सूचक विधान; बीडमध्ये मोठा भूकंप होणार?

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेला आता एक महिन्यांपेक्षा अधिक काळ झाला आहे. या प्रकरणात सीआयडी चौकशी सुरू आहे. आज संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी सीआयडीच्या टीमची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. वाल्मिक कराडचा खंडणी संदर्भातील एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे, या व्हिडीओवर देखील त्यांनी प्रतिक्रिया दिली.

नेमकं काय म्हणाले धनंजय देशमुख?

आम्ही सीआयडी ऑफिसला दुपारी येणार होतो, त्यानंतर सोशल मीडियावर हा व्हिडिओ बघितला. आजचा जो व्हिडिओ आला ही सगळी माहिती सगळे गुन्हे कशाप्रकारे घडले ही कागदोपत्री माहिती ऑफिसकडे आहे. त्यावर



तपास चांगल्या पद्धतीनं सुरू आहे. आम्हाला विचारलं जातं तुम्ही तपासावर समाधानी आहात का नाही? आम्ही एकच म्हणतोय तपास सुरू आहे. अजून बरेच असे व्हिडीओ समोर येणार आहेत, पुरावे जमा करण्याचे काम ब-यापैकी होत आलं आहे, असं धनंजय देशमुख यांनी म्हटलं आहे. दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी बालाजी तांदळेवर देखील प्रतिक्रिया दिली आहे. बालाजी तांदळे नावाचा माजी सरपंच बीडच्या सीआयडी ऑफिसला पण होता. आम्हाला चुकीच्या भाषेत बोलला, मला धमकवण्याचा प्रयत्न केला. आरोपीचे फोटो दाखवत होता. माझ्या भावाच्या पाठीमागे जी स्विप्ट गाडी लावण्यात आली, ती गाडी देखील त्याच्याच घरी होती. आजच्या व्हिडीओमध्ये देखील तो दिसत आहे. त्याची कसून चौकशी झाली पाहिजे, त्याला आरोपी केले पाहिजे. तो प्रत्येक घटनेमध्ये वारंवार पुढे दिसत आहे. माजी यंत्रणेला विनंती आहे त्याची चौकशी करा, जो काही तपास समोर येथील तो आम्हाला सांगा.

# राज्यस्तरीय प्रश्नमंजूषा स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

प्रतिनिधी - जगदीप वनशिव

पुणे- येथील हडपसर रयत शिक्षण संस्था, कर्मवीर विद्याप्रबोधिनी यांच्या मार्फत पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील राज्यस्तरीय महाविद्यालयीन प्रश्नमंजूषा स्पर्धा-२०२५ चे आयोजन एस. एम. जोशी कॉलेज, हडपसर येथे शुक्रवार दि.१७ व १८ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आले होते. प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक एस. जी. एम. कॉलेज, कराड, द्वितीय पारितोषिक इस्माईल साहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा, तृतीय पारितोषिक महात्मा फुले कॉलेज, पिंपरी, यांना तर उत्तेजनार्थ पारितोषिक बळवंत कॉलेज, विटा व सी.डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर यांनी मिळविले.प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे सचिव, विकास देशमुख (खअड ठशींव.) आणि कर्मवीर विद्याप्रबोधिनीचे कार्यकारी संचालक




प्रि.डॉ. विजयसिंह सावंत होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष रयत शिक्षण संस्थेचे पश्चिम विभागीय चेअरमन आमदार चेतन (दादा) तुपे पाटील, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य दिलीप (आबा) तुपे पाटील, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य अमर तुपे व रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव (उच्च शिक्षण) प्रि. डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विकास देशमुख (खअड ठशींव.) म्हणाले की, रयत शिक्षण संस्थेच्या वतीने गेली १८ वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या नावाने राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन केले जात आहे. अशा प्रकारच्या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये भावी प्रशासकीय अधिकारी होण्याची इच्छा निर्माण होऊ शकते. असे मत व्यक्त केले. तर कर्मवीर विद्याप्रबोधीनीचे कार्यकारी संचालक प्रि.डॉ. विजयसिंह सावंत म्हणाले की, प्रश्नमंजुषा स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळू शकतो. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा क्षेत्राकडे करिअर म्हणून पहावे. असे मत प्रि.डॉ. विजयसिंह सावंत यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील राज्यस्तरीय महाविद्यालयीन प्रश्नमंजूषा स्पर्धा-२०२५ चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये चाळीस विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे संयोजन डॉ.शहाजी करांडे, डॉ.अतुल चौरे, प्रा.ऋषिकेश खोडदे व प्रा.अजित भोसले यांनी केले. स्पर्धेसाठी ज्युरी म्हणून उपप्राचार्य डॉ.किशोर काकडे, उपप्राचार्य प्रा.संजय जडे, प्रो . डॉ.दिनकर मुरकुटे यांनी काम पाहिले. तर गुणलेखनाचे काम प्रो. डॉ. रंजना जाधव, प्रा. अस्मिता झोरिंग व प्रा.सागर दरेकर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.अतुल चौरे, पाहुण्यांची ओळख डॉ.शहाजी करांडे तर आभार उपप्राचार्य डॉ.संजय जगताप यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.नम्रता कदम, प्रा.नयना शिंदे यांनी केले. पारितोषिक वितरण समारंभासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भव्य राज्यस्तरीय कवी संमेलन व पुरस्कार वितरण सोहळा



न्यूज मेन हेडलाईन्स साने संगीत लोक कला मंच यांचा अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद यांच्यावतीने सत्कार वार रविवार दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी भव्य राज्यस्तरीय कवी संमेलन व पुरस्कार वितरण सोहळा अजिंक्य चॅरिटेबल फाउंडेशन बाईफ रोड उरुळी कांचन तालुका हवेली जिल्हा पुणे येथे उद्घाटन समारंभ संपन्न झाला . कार्यक्रमाचे प्रमुख उद्धघाक मा. श्री ज्ञानेश्वर (माऊली ) म कटके (आमदार शिरूर हवेली . ) अध्यक्ष मा .श्री सूर्यकांत नाम गुड (ज्येष्ठ साहित्यिक ) मा . श्री शंकर पाटील साहेब (वरिष्ठ पोलीस निरीक्षक उरुळी कांचन ) मा . श्री माणिक देवकर साहेब (क्रीडा अधिकारी पुणे शिक्षण मंडळ )प्रमुख निमंत्रक मा .श्री सतीश रामचंद्र खरात ( जिल्हा अधिकारी खादी ग्रामोद्योग महामंडळ पुणे ) मा .श्री आशिष शेटे साहेब (नेहरू युवा केंद्र पुणे ) मा . श्री महादेवराव कांचन ( मा . जिल्हा परिषद सदस्य ) मा . श्री दिलीप नाना वाल्हेकर (अध्यक्ष हवेली तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ) मा . श्री शरद गोरे ( राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद ) रेनबो .इंटरनॅशनल स्कूल चे अध्यक्ष संस्थापक मा .श्री .नितीन रामदास काळभोर .कदम वस्ती लोणी काळभोर . मुख्य कार्यक्रम आयोजक प्रा . सुरेश गोविंद वाळेकर यांनी केले .तसेच दीपप्रज्वलित उद्घाटकप्रमुख पाहुण्या च्या .हस्तेझाले . स रस्वती व .छत्रपती .शिवाजी महाराज . यांच्या प्रति मे स .पुष्पहार घालून पूजन तसेच मान्यवरांचे सत्कार .इतर कवी .संगीतकलावंत .यांचे सत्कार .झाले .साने संगीत जनजागृती लोक कला मंचाचे (अध्यक्ष सचिव ) मा.शिवराज ज्ञानोबा साने .यांच्या उपस्थित त्यांच्या कला मंचाने .गीतातूनपाहुण्यांचे स्वागत केले . .तसेच छत्रपती शिवाजी महाराज पोवाडा सादर केला प्रेक्षक लोकांचेमन मंत्रमुक्त केले कलावंत संस्कृती अंधारे तनया वाल्हेकर संकेत .खंडागळेरेखा .साने रिआन गाडीलकर .वैष्णवी सोळुंके .ऋतुजा आवळे . स्वरा अंधारे आरोही .सोळुंके अश्विनी सोळुंके .माही कदम .यश राज सोळुंके . हर्ष ता तारू . निहित तारू . ईशान गाडीलकर .सर्व .कला मंचाचे .विद्यार्थीव अध्यक्ष .शिवराज साने .यांना सन्मान चिन्ह व .गुणगौरव पत्र देऊन सन्मानित केले

# गांधी बाल मंदिर मध्ये एनसीसी परीक्षा संपन्न..



गांधी बाल मंदिर हायस्कूल मध्ये आज श्री महाराष्ट्र बटालियन च्या वतीने अ सर्टिफिकेट परीक्षा आयोजित करण्यात आली होती यामध्ये गांधी बाल मंदिर हायस्कूल, कार्तिक हायस्कूल, ए . ई. एस हायस्कूल ट्रॉम्बे चे कॅडेट सहभागी झाले होते. कार्यक्रमाला डेप्युटी कमांडर कर्नल प्रवीण कबतियाल सर श्री महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल डी.एस. सयाना सर, सुभेदार जितेंद्र कुमार सर सीएचएम अरुण घुगे सर उपस्थित होते . तिन्ही शाळांचे एनसीसी ऑफिसर उपस्थित होते. दोन वर्षाच्या प्रशिक्षणानंतर सदर परीक्षा एनसीसी कॅडेट देत असतात. याचा त्यांना पुढील शिक्षणात, आयुष्यात खूप उपयोग होत असतो. यात लेखी परीक्षा प्रॅक्टिकल परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येते. सदर परीक्षेचे आयोजन गांधी बालमंदिर हायस्कूलचे एनसीसी ऑफिसर श्री विश्वनाथ पांचाळ सर व अवधूत चव्हाण सर व शाळेचे मुख्याध्यापक श्री अनिल पांचाळ सर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते.

# शांत झोपेची कला आत्मसात करा सौ किशोरी शंकर पाटील

सध्याच्या धावपळीच्या स्पर्धेच्या युगात आपण भौतिक सुखाच्या मागे लागलो आहोत. जीवनातील समाधान, शांतता हरवत चाललो असताना. अशावेळी आपण अनेक प्रकारच्या काळजीचे ओझे मनावर घेऊन झोपायला जातो आणि दिवसभरातील चिंता, दुःख, वेदना, नाना प्रकारचे ताणतणाव व आशा- निराशेचे क्षण झोपेत ही आपली पिच्छा सोडत नाहीत. याचा झोपेवर मोठा परिणाम होतो आणि शांत झोप मिळणे दुरापास्त होत आहे. आपण झोपेचं खोबरे होताना पाहतो. सध्या ही समस्या हल्ली सगळ्यांना भेडसावत आहे. झोप शरीर आणि मनाला विश्रांती देते. पण झोपेत आपण स्वप्नही पाहतो. चांगल्या अथवा वाईट दृश्यांच्या स्वरूपात आपल्या मनात जे काही आहे, ते स्वप्नाच्या माध्यमातून बाहेर निघते. दडपलेल्या इच्छा, भिती स्वप्नात प्रकट होतात. बेडरूममध्ये चांगले चित्र, चांगली प्रार्थना, विचार लावले तर झोपतांना ते बघून वाचून व त्यावर मनन - चिंतन केले असता, त्यामुळे शांत झोप मिळू शकते आणि झोपेपुर्वीचा काळ हा सर्वात महत्वाचा असतो. . झोपण्यापूर्वी जर चिंता तणाव अथवा भितीने ग्रस्त असेल तर तशा मनःस्थितीत झोपू नये. सर्वप्रथम दीर्घ श्वास प्रश्वास करावा. चांगल्या पुस्तकांचा अभ्यास आणि थोडावेळ, भ्रामरी,ओंकार ध्यान, स्वतः ला मनाला शांतता देणा-या दृश्यांमध्ये गुंतवून ठेवावे. एखादी चांगली प्रार्थना करून झोपी जावे. तसेच चांगले संगीत ऐकावे. परंतु ताणतणाव, भिती चिंता नैराश्यात झोपल्याने या भावनांचा मनावर नकारात्मक परिणाम होतो. गाढ झोपेच्या आधी पाच मिनिटे आपल्यासाठी मौल्यवान असतात हे लक्षात ठेवावे. यावेळी नकारात्मक भावनांना दूर करण्याची कला शिकलो तर या भावनांना कायमचे दूर करू शकतो आणि आनंद, शांती, समाधान, प्रसन्नता, कृतज्ञता, दयाळूपणा इ. शुभ भावनेचा समावेश आपल्या जीवनात होऊ शकेल. झोपण्यापूर्वी चार तासांचा विचार आपल्या अवचेतन मनांत रहातो. झोपण्यापूर्वी मनाला स्वयंसूचना देऊ शकतो. मनाला व्यथित करणा-या समस्यांच्या समाधानाचा विचारही करू शकतो. तसे केल्याने चांगले परिणाम केव्हातरी नक्की मिळतात. ब-याच शास्त्रज्ञांना त्यांच्या प्रश्नांचे समाधान स्वप्नात मिळाले होते. झोपण्याच्या वेळेस आपल्या जवळ एक डायरी असावी ज्यावर आपल्या भावना लिहू शकू.आपल्या इच्छा, स्वप्न, समस्या, प्रश्न इत्यादी गोष्टी आपल्या डायरीत लिहून काढल्या तर मनावर ओझं राहत नाही. त्या लिहून काढल्याने मनही हलके होते. अशाप्रकारे शांत झोप मिळवण्यासाठी साध्यासोप्या उपायांनी झोपेला कला बनवावे. शांत झोपेची कला आत्मसात करा

सौ किशोरी शंकर पाटील विरार

# ममसोल्युशनमाईड सुजीत दातार यांना तितिक्षा इंटरनॅशनल चा तितिक्षा समर्पण पुरस्कार प्रदान....

## विवाह म संस्था अखंडित राहिली पाहिजे :सुजीत दातार यांचे प्रतिपादन

तितिक्षा इंटरनॅशनल
स्थापना :२ डिसेंबर २०२५
द्वारा : प्रिया प्रमोद दामले
संस्थापक, अध्यक्ष
संपर्क:मो.८६६९६७००७०

पुणे : १९ जानेवारी २०२५ तितिक्षा इंटरनॅशनल आयोजित तितिक्षा काव्य करंडक स्पर्धा २०२५च्या कार्यक्रमात मा.श्री सुजित दातार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून तितिक्षा इंटरनॅशनल कडून श्री.सुजीत दातार यांना तितिक्षा समर्पण पुरस्कार प्रदान करण्यात आला. तितिक्षा काव्य करंडक स्पर्धा घेण्यात आली.रोख पारितोषिक आणि काव्यकरंडक असे बक्षिसाचे स्वरूप होते.

स्पर्धेतील विजेते
प्रथम:प्रा.सुषमा नानगुडे
द्वितिय:विलास बाबर
तृतीय :सुप्रिया जोगदंड

त्यावेळी लग्नाला ५०वर्ष पूर्ण झालेल्या ११ दांपत्यांचा कौतुक सत्कार सोहळा करण्यात आला. श्री.व सौ. धुमाळ, श्री.व सौ.भुरके,श्री.व सौ.गोसावी, श्री.व सौ.देशपांडे, इंदापूरकर, श्री.व सौ.जावडेकर, श्री.व सौ.जेऊरकर,श्री.व सौ. गाडगीळ,श्री.व सौ.जोशी, श्री.व सौ.चिंचोरे या ५० वर्ष पूर्ण केलेल्या दांपत्यांचा मान्यवरांनी, त्यांना मुंडवळ्या बांधून सनईच्या सुरात पुणेरी पगडी, शाल साडीचोळी , मंगलाष्टक गाऊन सन्मान केला.

ङ्ग भारतीय संस्कृतीमधे विवाह हा संस्कार पवित्र मानला जातो. दुर्दैवाने या जागतीकरणाच्या युगात त्याचे पावित्र्य पाळले जात नाही. सहजीवनात जीवनसाथीदारांच्या परस्परांमधील सामंजस्याच्या भावनेचा अभाव वाढू लागला आहे.सहजीवन अधिक समृध्द होण्यासाठी तितिक्षा इंटरनॅशनलनेच ठोस पावलं उचलली पाहिजेत असे प्रतिपादन सोल्यूशनमाईड संकल्पनेचे प्रसारक सुजीत दातार यांनी केले. याप्रसंगी दातार बोलत होते.आगामी काळात लवकरच अखिल भारतीय पातळीवर असाच दांपत्त्यांचा कौतुक सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सुजीत दातार यांनी जाहिर केले. अध्यक्षस्थानी श्री.सुजीत दातार यांच्या मातोश्री श्रीमती सुवर्णाताई दातार होत्या. तितिक्षा इंटरनॅशनल आणि सोल्यूशनमाइंड यांच्या संयुक्त विद्यमाने व्यक्तिनिर्माण संकटे या विषयावर एक परिसंवादात्मक चर्चासत्र आयोजित करण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे आयोजन तितिक्षा इंटरनॅशनल च्या वतीने करण्यात येणार असल्याचे संस्थापक अध्यक्षा प्रिया दामले यांनी सांगितले.

अडचणींचे निरसन व निराकरण करण्याच्या उदात्त विचार सरणींचे व्यक्तिमत्त्व तितिक्षा इंटरनॅशनल कडे आहे.आगळीवेगळी संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचे कार्य तितिक्षा इंटरनॅशनल आणि सोल्यूशनमाइंड यांच्या संयुक्त विद्यमाने साकारले जाणार आहे. तितिक्षा इंटरनॅशनल संस्थेच्या



प्रिया प्रमोद दामले,भारतीय विचारधारा संस्थापक अध्यक्षा भारती महाडिक,मंदाताई नाईक, ऋग्रीराज दातार आदी मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते.

.प्रमोद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेच्या बालसचिव आणि कवयित्री अजया मुळीक, दिपक महाबळेश्वरकर , अजिता मुळीक, श्रीराम घडे ,दीपाराणी गोसावी, गौरव पुंडे आणि योगेश हरणे यांनी सोहळ्याचे संयोजन केले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com